**नियमित दरखास्त क्र.११३/२०१८**
**निशाणी क्रमांक ७२**

**सरतपास ऋणको तर्फे वकील श्री एस. एन. शिंदे यांचे मार्फत शपथेवर सुरु :-**

माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

**उलटतपास धनकोतर्फे विधीज्ञ श्री पी. आर. मालपाणी यांचेकडून सुरुः**

माझे शिक्षण सातवीपर्यंत झाले आहे. मी रस्त्याचे डांबरीकरण करणा-या ठेकेदाराकडे काम करीत होतो. हे म्हणणे बरोबर नाही की, गट नं. २५४/४ संदर्भात माझे व माझे भावात न्यायालयात वाद चालू आहेत. २५३ मध्ये पाच पोटहिस्से आहेत. मी त्याचे सात बारा पाहिलेले आहेत. २५३/१ हा बाबासाहेब बजरंग थोरात यांचा गट नंबर आहे. २५३/२ हा दत्तु बजरंग थोरात यांचा आहे. २५३/३ हा गायकवाड यांचा आहे. २५३/४ हा सुशिला शिंदे यांचा आहे. २५३/५ गुलाब गायकवाड यांचा आहे. त्याचे क्षेत्र मी सांगू शकत नाही. मी २५३/५ चा सात बारा पहिलेला आहे. मला लिहीता वाचता येते. गट नंबर २५३/६ चा सात बारा मी पाहिलेला नाही, त्याबद्दल मला काही माहिती नाही. मी गट नंबर २५३/६ याबद्दल गुलाब गायकवाड यांना काही विचारले नाही. नियमित दिवाणी दावा ४८३/११ यामध्ये मी पक्षकार नव्हतो. हे म्हणणे बरोबर आहे की, मी महसूल खात्यामध्ये नोकरीस नसल्यामुळे मला महसूल खात्याचे अभिलेख पाहण्याचे काम आले नाहीत. मी गट क्र. २५३/६ व्यक्तीगत कोणतीही तक्रार केलेली नाही. मी गट नं. २५३/६ चे अभिलेख कधी पाहिलेले नाही. तसेच त्याचा फेरफार पाहिलेला नाही. गट नंबर २५३ ची माझी व्यक्तीगत वहिवाट नाही, साक्षीदार स्वत: सांगतो की, माझा बांधला बांध आहे. गट नंबर २५३ चे पोटहिस्से केंव्हा व कसे पडले याची मला माहिती नाही. तसेच ते कोणी कोणला विकले यांची मला माहिती नाही. गट नं. २५३ च्या पोटहिश्श्याला कोणाची नावे लागलेली आहेत हे मी सांगू शकत नाही.

**नियमित दरखास्त क्र.११३/२०१८**
**निशाणी क्रमांक ७२**

रे. मु.नं. ४८३/११ यामध्ये सुनावणीच्या वेळेस मी कधीही आलेलो नाही व माझी साक्ष झालेली नाही. गट क्र. २५३ ची मोजणी झालेची मला माहिती नाही. प्र. वादी यांची सात बारा प्रमाणे ३५ गुंठे क्षेत्र आहे. त्याची मी कधी मोजणी केली नाही. त्यामुळे त्यांच्या ताब्यात ३५ गुंठे क्षेत्र आहे किंवा त्यापेक्षा जास्त आहे, हे मी सांगू शकत नाही. गुलाब व मी एकाच वस्तीमध्ये राहतो. हे म्हणणे बरोबर आहे की, गुलाब यांनी साक्षी देण्यास सांगीतले म्हणून मी आलो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दिले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

**(दि. ह. दाभाडे)**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
संगमनेर.

दिनांक :०९/०९/२०२४